राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग
सन २०१९-२० करिता अर्थसंकल्पिय
तरतूदीतून निधीचे वितरण

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन (वितंक) विभाग
शासन निर्णय क्रमांक : निधीवि-२०१८/प्र.क्र.७७/का.३९
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १६.०९.२०१९

शासन निर्णय :

राज्यातील विविध सामाजिक प्रश्नांमध्ये समाजाच्या हितासाठी विज्ञान व तंत्रज्ञानाचा अवलंब करणे, त्याचा प्रसार करणे आणि त्यास चालना देणे या उद्देशाने सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ अन्वये राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. उपरोक्त अधिनियमाच्या नियम क्रमांक १४ अनुसार राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाकरीता शासनाच्या एकत्रित निधीतून अनुदानाच्या स्वरुपात प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये निधी अदा करण्यात येतो. सन २०१९-२० करिता राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगासाठी मंजूर अर्थसंकल्पिय तरतूद रु. ३५.०० कोटी (रुपये पस्तीस कोटी फक्त) एवढी आहे. वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ अन्वये ६०% म्हणजेच रु. २१,००,००,०००/- (रुपये एकवीस कोटी फक्त) इतक्या मर्यादेत निधी खर्च करण्यास वित्त विभागाने मंजूरी दिली आहे. त्यास अनुसरुन राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाने त्यापैकी रु. १९,००,००,०००/- (अक्षरी रुपये एकोणीस कोटी फक्त) इतका निधी वितरीत करण्याबाबत विनंती केली आहे. आयोगाच्या विनंतीस अनुसरुन प्रधान सचिव (मातं व वितंक) यांनी राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाने मागणी केलेल्या रकमेच्या ७०% इतका निधी वितरीत करण्यास मंजूरी दिली आहे. त्यानुसार राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाकरिता रु. १३,३०,००,०००/- (अक्षरी रुपये तेरा कोटी तीस लाख फक्त) इतका निधी मंजूर करण्यात येत आहे.

२. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (वि.तं.क.) यांनी रु. १३,३०,००,०००/- (रुपये तेरा कोटी तीस लाख फक्त) या रकमेचे देयक सादर करुन मंजूर करुन घ्यावे. संबंधित रकमेचा धनादेश " सदस्य सचिव, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग" यांच्या नावे काढण्यात यावा व आयोगाकडे सुपूर्द करण्यात यावा.

३. सदर अनुदानाच्या रकमेचा विनियोग सन २००४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ मधील नमूद प्रयोजनासाठीच करण्यात यावा तसेच त्यामधून खर्च करताना वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. या अनुदानाच्या विनियोगाची तपासणी करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र व कार्यक्रमांचा सविस्तर अहवाल शासनास सादर करावा.

४. वरील खर्च मागणी क्रमांक "ए-५, २२५१ सचिवालय, सामाजिक सेवा, ०९० सचिवालय, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजना (००)(०३) विज्ञान व तंत्रज्ञान यामध्ये समन्वय व संशोधन (२२५१ ००४२), ३१ सहायक अनुदान (वेतनेत्तर)" या लेखाशिर्षाखाली टाकण्यात यावा व तो सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक : विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ च्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग पहिला उप विभाग एक अंतर्गत अ.क्र.२७, नियम क्रमांक १४९ अन्वये सदरहू मंजूरी देण्यात येत असून सहायक अनुदान मंजूर करताना वरील अधिनियमांतर्गत वित्त विभागाच्या मार्गदर्शक सूचनांचे तसेच वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक : अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९ च्या परिशिष्टातील क्रमांक ९ मधील अटी व शर्तीचे पालन करण्यात आले आहे.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ८ जुलै, २०१९ मधील परिच्छेद ७ मधील तरतूदीनुसार प्रशासकीय विभागास प्राप्त प्राधिकारानुसार तसेच प्रधान सचिव (मातं व वितंक) यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१६१३०२५६३८११ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dilip Prabhakar Deshmukh

Digitally signed by Dilip Prabhakar Deshmukh
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=DIT Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=89b94ecffd8918a2710a5d1d74df9831b69f2b6f91aaf28f5f7e4afef961baa1, serialNumber=db7f7568a940bb360a1ce1bd2bdd5ff1d01208e90a71edccbe553bec506cb3e6, cn=Dilip Prabhakar Deshmukh
Date: 2019.09.16 13:14:09 +05'30'

(दि.प्र. देशमुख)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई
३) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
४) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
५) सदस्य सचिव, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग, मंत्रालय, मुंबई
६) नियोजन विभाग (कार्यासन १४४३), मंत्रालय, मुंबई
७) वित्त विभाग (व्यय-४), मंत्रालय, मुंबई
८) सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन ३९ (रोखशाखा) तीन प्रती.
९) निवडनस्ती.